दिनांक ०३/०९/२०२६

-: प्रेसनोट :-

घटक	मुंबई विभाग
तक्रारदार	पुरुष, वय ५० वर्षे
आरोपी	१) विजय रमेश पाटील, कामगार. २) निरवकुमार चुणीलाल जैसूर, दुय्यम अभियंता. दोन्ही के/पश्चिम वॉर्ड, अंधेरी पश्चिम, बृ.म.न.पा., मुंबई.
तक्रार	यातील तक्रारदार यांना बेकरीचा व्यवसाय चालु ठेवायचा असल्यास आणि त्यांचे व्यवसायास कोणताही त्रास होणार नाही याकरीता लोकसेवक विजय पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे लोकसेवक निरवकुमार जैस्वूर यांचे वतीने रु. ७०,०००/- लाचेची मागणी केली. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लोकसेवक यांच्याविरूध्द ला.प्र.वि, मुंबई विभाग येथे दिनांक ०२/०९/२०२६ रोजी तक्रार केली.
तक्रारीची पडताळणी	प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०२/०९/२०२६ रोजी पडताळणी केली असता, लोकसेवक विजय पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे रू. ७०,०००/- लाचेची मागणी करून तक्रारदार यांना त्यांचे वरिष्ठ अधिकारी दुय्यम अभियंता निरवकुमार जैसूर यांची भेट घालून दिली. नमूदवेळी लोकसेवक निरवकुमार जैसूर यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती रु. ६०,०००/- इतक्या लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निषन्न झाले.
सापळा कार्यवाही	दिनांक ०२/०९/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक विजय पाटील यांना तक्रारादार यांच्याकडून रू. ६०,०००/- लाच स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले.
गुन्हा रजिस्टर नं./ कलम/ पोलीस ठाणे/ जिल्हा, दिनांक व वेळ	२४/२०२६, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७. ला.प्र.वि., मुंबई विभाग दिनांक ०३/०९/२०२६ रोजी ०५:३० वा.
आरोपी अटक दिनांक व वेळ	दिनांक ०३/०९/२०२६ रोजी ०५:३० वा.
सापळा अधिकारी	श्री अनिल चित्तरवाड, पोलीस निरीक्षक, मो.नं. ८९७५८९५६५६
पर्यवेक्षक अधिकारी	श्री. गंगाप्रसाद मुदिराज, सहाय्यक पोलीस आयुक्त, मो.नं. ९५६३५७७७७७
सापळा पथक	१) पो.ह. ०३२११/मठपती २) पो.ह. ०३७१२/गावडे ३) पो.ह. ०६१५६२/ सोनोने ४) म.पो.ह. ०७८७१/ पाटील ५) म.पो.शि. ०९११७८/गवांदे ६) पो.शि. १८१२२०/वाईगडे ७) स.फौ.चा. ३३९८६/ चौरे ८) पो.शि.चा. २१६९५६/ दुधाळ.
मार्गदर्शन	१) श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि., मुंबई २) श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त(१), ला.प्र.वि., मुंबई, मो.नं. ७७९६५९११०० ३) श्री. अनंत साळुंखे, अपर पोलीस उप आयुक्त(२), ला.प्र.वि., मुंबई, मो.नं. ८२७५१८८११९

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी खालील नमूद केल्याप्रमाणे संपर्क साधावा.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुख्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.	सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई ४०००३०
दूरध्वनी क्र. :- 022-24921212, 022-24922618 व्हॉट्सअप क्र. :- 8828241064 हेल्पलाईन क्र. :- 1064,	दूरध्वनी क्र. :- 022-24921212,
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in	ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

(अजित मुळे)

सहाय्यक पोलीस आयुक्त(प्रशासन),

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई